।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।
४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३
RNI NO.
MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १९ जुलै २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक २८ वा

वाढेगाव येथे अवैध वाळू वाहतुकीवर सांगोला पोलिसांची कारवाई

तीन लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

सांगोला : अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात सांगोला पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला पुन्हा एकदा यश मिळाले असून, वाढेगाव येथील कोरडा नदीपात्रात कारवाई करत विना नंबरचे वाहन आणि वाळूसह ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवार (दि. १८ जुलै २०२६) रोजी पहाटे ४.३५ वाजण्याच्या सुमारास सांगोला पोलीस ठाण्याचे पथक वाढेगाव परिसरात गस्त घालत असताना महादेव मंदिराजवळील कोरडा नदीपात्रातील कच्च्या रस्त्यावर संशयास्पद वाहन दिसून आले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, अशोक लेलंड दोस्त कंपनीचे बिस्कीट रंगाचे विना नंबरचे वाहन (चेसीस क्रमांक चह१-२२९४००-७२९५०) आढळले. वाहनाच्या मागील हौद्यात अंदाजे एक ब्रास वाळू, भरून तिची विनापरवाना वाहतूक केली जात असल्याचे उघडकीस आले.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३ (२) व ३०५ (ई) अन्वये अन्वये सांगोला पोलीस ठाणे भाग ०५, गुन्हा क मांक ६४७/२०२६ दाखल करण्यात आला आहे. कारवाईत ३,०७,००० किमतीचे अशोक लेलंड दोस्त वाहन तसेच अंदाजे ७,००० किमतीची एक ब्रास वाळू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या गुन्ह्याची फिर्याद पोलीस कर्मचारी सद्दाम रसूल नदाफ (वय ३३) यांनी दिली असून, गुन्ह्याचा वर्दी अहवाल न्यायालयाकडे पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पोलीस नाईक ९३१ बनकर यांच्याकडे या प्रकरणाचा पुढील तपास सोपविण्यात आला आहे.या कारवाई दरम्यान आदिनाथ माणिक ऐवळे (वय २४, रा. मराठी शाळेजवळ, वाढेगाव, ता. सांगोला, जि. सोलापूर) यास ताब्यात घेण्यात आले.

शासनाची कोणतीही पूर्वपरवानगी, वैध पास किंवा परवाना नसताना नैसर्गिक संपत्तीची चोरी करून वाहतूक केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला आहे.

दरम्यान गेल्या काही दिवसांपासून सांगोला तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांनी धडक कारवायांचा सपाटा लावला असून, नैसर्गिक संसाधनांची होणारी बेकायदेशीर लूट रोखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. त्यामुळे अवैध वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली असून, नियमांचे उल्लंघन करणायांवर कठोर कारवाईचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

योग्य निर्णय क्षमता, प्रयत्नातील सातत्य, आत्मविश्वास आणि यश मिळविण्याची जिद्द या गुणांच्या बळावरच विद्यार्थी यशस्वी होतात : पल्लवी पाटील-भोरे

विद्यामंदिर परिवारातील शिष्यवृत्तीधारक गुणवंतांचा सत्कार उत्साहात संपन्न

सांगोला : जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर विविध स्पर्धा आणि आव्हानांना सामोरे जावे लागते.योग्य निर्णय क्षमता, प्रयत्नातील सातत्य, आत्मविश्वास आणि यश मिळविण्याची जिद्द या गुणांच्या बळावरच विद्यार्थी यशस्वी होतात. क्षेत्र कोणतेही असो, आपल्या कार्याचा ठसा समाजात उमटला पाहिजे, असे प्रतिपादन इचलकरंजी महानगरपालिकेच्या विद्यमान आयुक्त पल्लवी पाटील-भोरे यांनी केले. सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या ८४ विद्यार्थ्यांच्या भव्य सत्कार समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

पुढे त्या म्हणाल्या, ही केवळ सध्या सोलापूर जिल्ह्यात सांगोला विद्यामंदिर हा गुणवत्तेचा ब्रँड ठरत आहे. दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्याच्या व जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीमध्ये बहुसंख्य विद्यार्थी हे सांगोला विद्यामंदिरचे असतात. आमच्या शिक्षकांचे अथक परिश्रम, पालकांचे सहकार्य व विद्यार्थ्यांची चिकाटी हेच या यशामागचे रहस्य आहे. संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यशाची सुरुवात आहे. जीवनात प्रत्येक टप्प्यावर स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. कोणत्याही परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि यशासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. बुद्धिमत्ता चाचणीतील कोडी केवळ परीक्षेपुरती मर्यादित नसून जीवनातील अनेक प्रश्नांची उकल करण्याची दृष्टी त्यामधूनच अवगत होते. गणितातील सूत्रेही जीवनातील समस्यांवर उपाय शोधण्याची विचारशक्ती विकसित करतात. ध्येय निश्चित करून वेळेचा योग्य उपयोग करणारा विद्यार्थी स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतो. आज शिक्षणाचे व्यापारीकरण होत असताना सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळासारखी आदर्श शैक्षणिक संस्था आणि विद्यामंदिर परिवारातील शिक्षक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी प्रामाणिकपणे परिश्रम घेत आहेत. अशा संस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थी खऱ्या अर्थाने भाग्यवान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके होते. यावेळी संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शकरराव सावत, आय.सी.आय.सी.आय बँकेचे महाराष्ट्र स्टेट हेड यशवंत भोरे, सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य चारुदत्त जगताप, नाझरा विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड, कोळा विद्यामंदिरचे प्राचार्य श्रीकांत लांडगे, सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा कोळेकर, संस्था बाह्य परीक्षा विभाग प्रमुख नामदेव खंडागळे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य चारुदत्त जगताप यांनी विद्यामंदिर परिवाराच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय क्रीडा शिक्षक सुनील भोरे यांनी दिला.

यावेळी सांगोला विद्यामंदिर प्रशाला, नाझरा विद्यामंदिर प्रशाला, कोळा विद्यामंदिर प्रशाला व सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूलमधील इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत आणि मार्गदर्शन करणाऱ्या विभाग प्रमुख, मार्गदर्शक शिक्षकांचे व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मान्यवरांचे हस्ते सत्कार संपन्न झाले.आभार उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे यांनी मानले तर सूत्रसंचालन आशुतोष नष्टे यांनी तर पारितोषिक वाचन वैभव कोठावळे व चैतन्य कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाह्य परीक्षा विभागातील शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

२२ व २३ जुलै रोजी वारकऱ्यांसाठी चरणसेवा व आरोग्यसेवा शिबिराचे आयोजन

दिपकआबा मुख्यमंत्री सहायता कक्ष व काकासाहेब साळुंखे पाटील चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम

सांगोला : आषाढी वारीनिमित्त देशभरातून श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष आणि काकासाहेब साळुंखे पाटील चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ जुलै रोजी नक्षत्र मंगल कार्यालय, मेथवडे फाटा (ता. सांगोला) येथे दोन दिवसीय चरणसेवा व आरोग्यसेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात लोकसहभागातून वारकऱ्यांना आरोग्य तपासणी, औषधोपचार, चरणसेवा, अल्पोपहार व मुक्कामाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिली.

या शिबिराच्या नियोजनासाठी शनिवारी (१८ जुलै) नक्षत्र मंगल कार्यालय, मेथवडे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व सुनेत्रा वहिनी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांच्या पुढाकारातून पंढरपूरला येणाऱ्या वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्याच संकल्पनेतून हा सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. दरवर्षी लाखो भाविक शेकडो फाटा येथे बैठक पार पडली. बैठकीस वाढेगाव, बामणी, मांजरी, संगेवाडी व शिरभावी परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते. यावेळी दिपकआबा साळुंखे पाटील बोलत होते.

यावेळी दिपकआबा म्हणाले, राज्यात परंपरा आणि संस्कृती जपणारे सरकार कार्यरत असून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, किलोमीटरचा पायी प्रवास करून विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात.

या प्रदीर्घ प्रवासामुळे अनेक वारकऱ्यांना आरोग्यविषयक अडचणी निर्माण होतात. त्या पार्श्वभूमीवर शिबिरात वारकऱ्यांच्या पायांची आयुर्वेदिक तेलाने मालिश करून चरणसेवा, आरोग्य तपासणी, आवश्यक औषधांचे वाटप तसेच अल्पोपहार व मुक्कामाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वारकऱ्यांना आरोग्य, भोजन किंवा अन्य कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सर्व आवश्यक नियोजन करण्यात आले असल्याचे सांगून या दोन दिवसीय चरणसेवा व आरोग्यसेवा शिबिराचा जास्तीत जास्त वारकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले.

मुक्त विचार

विचारधन

मुला-बाळांना शिकावा, जो वेळेवर जय मिळवतो, तो जगावरही जय मिळवतो.देव दगडात नाही तर माणसात आहे.

-संत घाडगे महाराज

आपला मेंदू हेल्दी कसा ठेवावा

मानवाला अनेक प्रकारच्या सवयी असतात. काही चांगल्या सवयी तर काही वाईट. चांगल्या सवयींमुळे माणूस तर चांगलाच राहतो परंतु काही वाईट सवयी अक्षरशः मेंदूची वाट लावत असतात. कारण त्या वाईट सवयी कामच तंस करत असतात. अशा काही वाईट गोष्टीबद्दल आपण माहिती पाहणार आहोत. आणि त्या टाळणे खूप गरजेचे आहे.

१) अपुरी झोप : झोपल्यानंतर मेंदूला विश्रांती मिळते . याशिवाय झोपेच्या वेळी मेंदू नवीन पेशी तयार करत असतो. मात्र जर आपण सात तासांपेक्षा कमी झोपलो तर नवीन पेशी तयार होत नाहीत. सोबतच झोपेच्या कमतरतेमुळे डिमेन्शिया, अलझायमर अशा आजारांचा धोकाही वाढतो. जर आपल्याला आपल्या मेंदूचे संरक्षण करायचे असेल तर रात्री किमान सात तासांची झोप घेणे गरजेचे आहे. आठ तास झोपणे हेही मेंदूसाठी चांगलेच आहे. अमेरिकेच्या न्यूरोलॉजी आणि वेलनेस सेंटरच्या मते – आपल्या मेंदूचे सर्वात जास्त नुकसान हे अपुऱ्या झोपी मुळे होते. प्रौढांसाठी पुरेशी झोप म्हणजे दिवसातील २४ तासांपैकी सात ते आठ तासांची झोप होय आणि रात्री सलग झोप घेणे तर चांगलेच .

२) नाश्ता टाळणे : रात्रभर न जेवल्यानंतर दिवसभर काम करण्याची ऊर्जा ही आपल्याला नाष्ट्या मधून मिळते. पण काहीजण कामासाठी किंवा इतर गोष्टींसाठी घाई करतात व नाश्त्यासारखी महत्त्वाची गोष्ट सोडून देतात . असे केल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होते व त्यामुळे मेंदूवरती परिणाम होऊ शकतो.

३) पुरेसे पाणी न पिणे : आपल्या मेंदूतील ७५ टक्के भाग हा पाण्याचा आहे. त्यामुळे आपण तहानलेले असलो की आपला मेंदू नीट काम करत नाही. तज्ज्ञांच्या मते – प्रौढ व्यक्तीने आपला मेंदू निरोगी ठेवण्यासाठी दिवसातून कमीत कमी दोन लिटर पाणी प्यायला हवे.

४) दीर्घकाळ तणावात असणे : खूप काळ तणावामुळे मेंदूच्या पेशी मरतात. आणि मेंदूचा पुढचा भाग हा आकुंचन पावतो. या गोष्टीचा आपल्या विचारशक्तीवरती व स्मरणशक्तीवरती परिणाम होतो. संशोधक म्हणतात की – जे लोक सतत कामात गुंतून राहतात व कोणत्याच कामाला नाही म्हणू शकत नाही अशा लोकांना सर्वात जास्त ताण सहन करावा लागतो. पण असे करणे ताबडतोब थांबवले पाहिजे. कोणत्याही प्रकारे अतिरिक्त तणाव घेणे टाळले पाहिजे.

५) अंधारात जास्त वेळ घालवणे : जास्त प्रकाश आणि हवेची हालचाल होत नसलेल्या अशा या वातावरणामुळे मेंदूवरती मोठा दबाव निर्माण होतो. कारण सूर्यप्रकाशाचा संपर्क आपल्या मेंदूसाठी खूप महत्त्वाचा असतो. नाहीतर मग निराशासारख्या काही समस्या उद्भवू शकतात. आपला मेंदू निरोगी ठेवण्यासाठी आपण दररोज उन्हात जाणे गरजेचे आहे. यासाठी बाहेर जायला हवे. जर तुम्ही घरी असाल तर दरवाजे व खिडक्या उघडे ठेवले पाहिजेत. आणि सकाळी लवकर उठण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

६) नकारात्मक विचार : नकारात्मक विचारांमुळे तणाव, नैराश्य , चिंता निर्माण होते. म्हणून नकारात्मक विचार करणे टाळलेच पाहिजे. जर आपण असे वारंवार केले तर आपल्याला त्याची सवय लागेल. जर एकट्याने हे थांबवणे शक्य नसेल तर मानस उपचार तज्ञांची सुद्धा आपण मदत घेऊ शकतो. जे लोक आपली एनर्जी खाली आणतात अशा व्यक्तींपासून लांब राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

७) सतत एकटं राहणं : लोकांमध्ये मिसळणे, लोकांसोबत गप्पा मारणे, राहणे हे आपल्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. एकटे राहिल्यामुळे पुरेशी झोप न मिळणे एवढाच वाईट परिणाम आपल्या मेंदू वरती होत असतो. मित्र–मैत्रिणी सोबत व घरातल्या व्यक्तीसोबत राहिल्यामुळे आपला मेंदू ताजातवाना राहतो.

८) सतत हेडफोन वापरणे : मोठमोठ्या आवाजात गाणे ऐकणे किंवा मोठ्या गोंगाटात जास्त वेळ राहिल्यामुळे ऐकण्याची क्षमता कमी होते. श्रवणशक्ती कमी झाली तर त्याचा थेट परिणाम आपल्या मेंदूवरती होतो. यामुळे अभ्यास करणे व लक्ष केंद्रित करणे कठीण होऊन जाते. हेडफोन वापरण्यापूर्वी व जास्त गोंगाटात राहण्यापूर्वी विचार करणे खूप गरजेचे आहे.

९) गुगल सर्चचा अतिवापर : आपल्याला किती फोन नंबर पाठ असतात? किती पत्ते किती संदर्भ आपल्याला तोंडपाठ असतात ? गुगल असल्यामुळे आपण सध्या गोष्टी लक्षात ठेवण्याचे कष्टच घेत नाहीत .आपण एखादी गोष्ट पटकन सर्च करतो, वापरतो आणि पुढे जातो. यामुळे आपली स्मरणशक्ती व विचारशक्ती दिवसेंदिवस कमकुवत होत चाललेली आहे. जर मेंदूला चालक ठेवायचे असेल तर इंटरनेटचा वापर टाळला पाहिजे व मेंदूला विचार करण्यास भाग पाडले पाहिजे.

१०) जास्त खाण्याची सवय : कितीही हेल्दी फूड असेल तरीही ते जास्त खाण्याची सवय ही मेंदूला हानिकारकच असते. संशोधनातून असे दिसून आले आहे की – जास्त खाल्ल्यामुळे मेंदूच्या धमन्यांमध्ये अडथळे निर्माण होतात. आणि रक्तप्रवाह कमी होतो. म्हणूनच मध्यम व योग्य आहार घेणे महत्त्वाचे मानले जाते.

११) अतिरिक्त स्क्रीन टाईम : जास्त स्क्रीन टाईमचा मेंदूच्या आकारावर व विकासावर मोठा परिणाम होतो. मोबाईल फोनच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फिल्डच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने डोकेदुखी, ब्रेन ट्यूमर यासारखे आजार होऊ शकतात. या कारणामुळेच मुलांचा स्क्रीन टाईम कमी केला पाहिजे. तसेच फोन रात्री झोपताना उशाशी व शरीराच्या अगदी जवळ ठेवून झोपणे टाळले पाहिजे.

वास्तुशास्त्र आणि आरोग्य

आजकाल ज्याचा अनेक प्रकारांनी बोलबाला होत आहे व जे अनेकांकडून अभ्यासले जात आहे असे वास्तुशास्त्र गेल्या काही वर्षांपासून लोकांच्या मनात घर करुन आहे. वास्तुशास्त्र म्हणजे वास्तूचे शास्त्र. साहजिकच जर हे शास्त्र वास्तुचे म्हणजेच रचनेचे आहे तर मग व्यक्तीच्या आरोग्याशी याचा संबंध कसा? वरकरणी असा प्रश्न मनात येणे साहजिकच आहे परंतू शास्त्राचे खरे स्वरूप लक्षात घेतल्यास या शंकेचे निरसन होण्यास वेळ लागणार नाही. वास्तूशास्त्राचा संबंध अष्टदिशांशी आहे. या अष्टदिशांचे नाते पंचमहाभूतांशी आणि नवग्रहांशीसुद्धा. आपले शरीर हे सुध्दा पंचमहाभूतांनी बनलेले आहे. पंचमहाभूतात्मकमिदं शरीरम्, सहाजिकच या शरीराचा अष्टदिशांशी अन्योन्य संबंध आहे. घरातील अष्टदिशांचा उपयोग करून पंचमहाभूतानुसार घराची आखणी केली तर या तत्वांचा लाभ त्यांच्या नैसर्गिक स्वभावानुसार घराला मिळतो.

घराचे ऊर्जेशी नवसंजीवक नाते जोडले जाते. सूक्ष्मातिसूक्ष्म प्राणशक्तीचा लाभ मिळून निरामय जीवनाची उपलब्धी होते. वास्तुशास्त्र आणि आरोग्य यांचा परस्परसंबंध जाणून त्यानुसार अनेक उपाय मी सुचविले वास्तुशास्त्राचे वैद्यकशास्त्राशी असलेले जवळचे नाते पाहुन मीही थक्क झालो. अनेक आरोग्याविषयक समस्यांची उकल या शास्त्राने चुटकीसरशी केली आहे.काही दिवसांपुर्वी एक ३५-४० वर्षांचे जोडपे काहीशा त्रस्त मनःस्थितीतच मला भेटण्याकरिता आले. पतिमहाशयांची मुख्य तक्रार होती निद्रानाश.त्यांना डोकेदुखी आणि अलळवळी त्रास सुरू झाला होता. माझ्या संशोधक वृत्तीमुळे त्यांच्या घराचा आराखडा व झोपण्याची दिशा याबद्दल जाणून घेतले. इशवऑ मध्ये शिरताक्षणीचा इशव च्या बरोबर वर भिंतीवर सिलिंगलगत असणार्या लाकडी कपाटाने लक्ष वेधून घेतले मी वहिनींना विचारले,हे कपाट केव्हापासून येथे आहे. त्यावर त्यांनी तीन महिन्यांपुर्वी घरातील जास्तीचे सामान राहावे म्हणून कपाट बनवून घेतल्यास सांगितले. हे जोडपे उत्तरेला डोके करुन झोपत आहे हेही कळले.

वस्तुशास्त्रानुसार दिशांचे महत्त्व जोडप्याला पटवून देऊन दक्षिणेला डोके करून झोपण्यास सांगितले तसेच नविन लकडी कपाटामुळे विकतचे दुखणे मागे लावून घेतल्याचेही सांगितले आणि बेड कपाटाच्या खाली येणार नाही असा सरकवून ठेवण्याचा सल्ला दिला. अर्थात दोन्ही तोडग्यांकरिता खिशाला कात्री लागणार नव्हतीच म्हणूनच की काय त्या जोडप्याने हा प्रयोग करुन बघण्याची त्वरित तयारी दाखवली. नंतर केवळ १० दिवसांतच पतिमहाशय भेटायला आले व विकार मुळातून गेला तसेच डोकेदुखी आणि अलळवळी त्रासदेखिल कमी झाल्याची शुभवार्ता दिली. अलळवळी, हृदयरोग, निद्रानाश, शिरःशूल, उच्च रक्तदाब, प्रमेह, अनेक लैंगिक समस्या तसेच निपुत्रिकत्व, कन्यासंतती या व अशा अनेक शारीरिक समस्यांचे मूळ वास्तुशास्त्रात आढळते.

वास्तूचा शुभाशुभ प्रभाव वास्तूमध्ये वास्तव्य करणार्या व्यक्तीच्या मनावर पडतो. अशुभ प्रभावामुळे चिडचिडेपणा, नैराश्य, भय, संशयीवृत्ती,चिंता यांसारख्या रिपूंचा जन्म होतो. वास्तूमध्ये आढळणारी दिशादुष्टी ही अनेक अनारोग्यकारक फळांचे बीज आहे. दिशादुष्टी कशी होते हे जाणण्यापुर्वी दिशांचा स्वभाव, दिशांचे पंचमहाभूतात्मक संघटन जाणून घेणे आवश्यक आहे.दिशांचे नवग्रहांशी असलेले नाते उलगडणे आवश्यक आहे. खालील आकृतीवरुन हे सहज स्पष्ट होईल.

दिशाप्रभाग : दिशांचा ग्रहांशी असलेला संबंध पुढील आकृतीवरुन स्पष्ट होईल. वस्तुशास्त्रानुसार उत्तर व पुर्व या ऊर्जेच्याउगम दिशा आहेत. पूर्वेस प्राणिक ऊर्जेचा तर उत्तरेस जैविक ऊर्जेचा उगम आहे. म्हणूनच ईशान्य दिशेस दोनही धनऊर्जांचा संगम दिसून येतो. त्याचप्रमाणे दक्षिण व पश्चिम या ऊर्जेच्या अस्तदिशा आहेत. अर्थातच नैऋत्य ही दिशा अत्याधिक ऋण प्रवाहांचे मीलन दाखवते. अष्टदिशांचा द्विऊर्जाप्रवाहांशी, पंचमहाभूतांशी व नवग्रहांशी असलेला संबंध समजून घेऊनच वास्तूरचना करणे श्रेयस्कर आहे.

ईशान्य ही शिवप्रधान दिशा आहे.जलतत्वाच्या या दिशेचे माहात्म्य विशेष आहे. ऊर्जेची प्रमुख उदगम दिशा, जलतत्व, शिवाचे स्थान, देवघर, प्रार्थना, संकल्प, साधना या बहुविधदृष्ट्या या दिशेस सर्वश्रेष्टत्व साम्राज्ञीस्वरुप आले आहे . सामान्यात: समृध्दी व वैभव प्रदान करणारी ही एक सात्विक दिशा आहे. देवघर, अभ्यासिका, पाण्याचा,औषधांचा साठा, णपवशऑसऑपवटाकीचे स्थान यासाठी ही जागा उत्तम. परंतु या दिशेला जर अन्य तत्व आले तर ढेळश्रशीं, कर्त्या पुरुषाची इशवऑ या दिशेस आली तर साहजिकच मानवी आरोग्य बिघडवणार्या व्याधींचा ससेमिरा चालू होतो. येथील शयनकक्षामुळे स्त्री-पुरुषांना कामाविषयाबाबत कटुता, अल्प संततीसौख्य तसेच अनेक लैंगिक समस्या यांतून नैराश्य पदरी पडते.

बुध्दिमांद्य, शैक्षणिक अवनती, प्रगतीमध्ये अडथळे येथील दुष्टतत्वामुळे भोगावे लागतात. ईशान्य दुष्ट घरामध्ये घरातील किमान एका व्यक्तीस तरी तीव्र डोकेदुखी हमखास असतेच. घराची पूर्व दिशा बंद असेल किंवा जड असेल तर वेळोवेळी अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. साहजिकच प्रगतीचा आलेख घसरणीला लागतो. त्यामुळे अकारण चिडचिड, थकवा, ग्लानी येणे व औदासीन्य यांचा पाठलाग सुरु होतो. प्राणिक ऊर्जा प्रावाहांमध्ये खंड पडल्यामुळे स्फूर्ती, चैतन्य, बुध्दी यांची क्षती होते. डोके काम करत नाही, अशी परिस्थिती उद्भवते. याउलट पुर्वप्रासादामुळे सुर्याच्या सर्वश्रेष्ट शक्तिमय ऊर्जेचा वरदहस्त लाभल्याने नवनव्या उपक्रमांकरिता मनाची उभारी भरार्या घेऊ लागते. प्रखर बुध्दिमत्तेचे आविष्करण कामांमध्ये दिसून येते व उत्तरोत्तर प्रगतीचे टप्पे पादाक्रान्त करणे शक्य होते. प्रसन्न मनःस्वास्थाचा परिणाम शरीरस्वास्थावर होऊन तब्येत ठणठणीत राहते.

उत्तर दिशा ही ऊर्जेची प्रमुख उगमदिशा (जैविक ऊर्जा) असून चंद्राचा अंमल या दिशेवर आहे. 'सोम'ही शीतलत्व प्रदान करणारी देवता वास्तुपुरुषमंडळात याच दिशेत आढळून येते. जलतत्वाच्या या दिशेवर 'गुरु'चा प्रभाव प्रकर्षाने आढळून येतो. 'कुबेराचे' स्थान असणार्या या दिशेचा अधिपती बुध आहे. ही दिशा सर्व सिध्दींची कारकच आहे.

पैसा हा आधुनिक युगात ईश्वरस्वरुप मानला आहे. अर्थहीन व्यक्ती समाजात कवडीमोलाच्या बनतात. पैसा येणे व तसाच निघून जाणे यामुळे मनात चिंता निर्माण होते. हीच चिंता सर्व व्याधींचे मुख्य कारण आहे. उत्तर, उत्तर-वायव्य, ईशान्य या दिशांतील दोष आर्थिक समस्यांना निर्माण करुन चितेसम चिंतेलाच आमंत्रण देतात. उत्तर, वायव्य,पश्चिम वायव्य या सर्व दिशांच्या अयोग्य व तत्वविरोधी रचनेमुळे हृदयविकार, रक्तदाब, पतिपत्नींमधील दुरावा,मुलांच्या आरोग्याला अपाय, तसेच विवाहाबाबत प्रयत्न करुनही असमर्थता, यामुळे वाढते नैराश्य, परिणामी घातपात अथवा घटस्फोट, आत्महत्येसारख्या कुमार्गाचे अवलंबन केल्याचे दिसुन येते. स्त्रियांच्या बाबतीत नैराश्येचा कहर झाल्यास Hysteria सारखे मानसिक आजार उद्भवू शकतात. उत्तर दिशेस Hall, Studyroom, पाण्याचा साठा, तिजोरी असणे उत्तम. पति-पत्नींची BedRoom, Toilet , Kitchen असू नये. उत्तरेच्या पती-पत्नीच्या BedARoom मुळे कामविषयक कटुता निर्माण होतो. या प्रभागात संडास आल्यास नैसर्गिक ऊर्जाप्रवाहांना बाधा येऊन सर्व गणितच विस्कळित होते. संशय, विक्षिप्त स्वभावात, मधील घसरणीत याचे प्रतिबिंब उठते. उत्तर-ईशान्य-पूर्व या ऊर्जेच्या उगमदिशा असल्याने या दिशांमधील दोषांचा मनःस्वास्थावर विपरीत परिणाम होतो.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-३७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

खंडागळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या यशस्वी वैद्यकीय सेवेची १३ वर्षे पूर्ण

वर्धापन दिनानिमित्त २५ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान भव्य आरोग्य सेवा महोत्सवाचे आयोजन डॉ. परेश खंडागळे

सांगोला : कडलास रोड, सांगोला येथील खंडागळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलने ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, अत्याधुनिक आणि परवडणारी वैद्यकीय सेवा देत यशस्वी १३ वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, दि. २५ जुलै २०२६ ते सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ‘‘भव्य आरोग्य सेवा महोत्सव‘‘ आयोजित करण्यात आला असल्याची माहिती डॉ.परेश खंडागळे ,डॉ. स्वाती खंडागळे यांनी दिली

या महोत्सवामध्ये सर्वसामान्य नागरिकांना अत्यल्प दरात शस्त्रक्रिया, विविध आजारांवरील उपचार, शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ, सर्व प्रमुख हेल्थ इन्शुरन्स कंपन्यांची कॅशलेस सुविधा तसेच हॉस्पिटल बिलावर विशेष सवलती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

अल्प दरात शस्त्रक्रिया : महोत्सवात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ६,०००, नॉर्मल डिलिव्हरी ५,०००, गर्भाशयाची पिशवी साफ करणे ६,०००, सिझेरियन १५,०००, गर्भाशयाची पिशवी काढणे १५,०००, सुंता १०,०००, अपेंडिक्स, हर्निया, मुळव्याध तसेच फिशर व फिस्टयुला शस्त्रक्रिया प्रत्येकी १५,००० मध्ये करण्यात येणार आहेत.

दुर्बिणीद्वारे (डररिऑलेळिल) गर्भाशयाची पिशवी काढणे २०,०००, कुटुंब नियोजन १०,००० आणि अपेंडिक्स शस्त्रक्रिया २०,००० मध्ये उपलब्ध राहतील. मेडिकल, भूलतज्ज्ञ, इम्प्लांट व लॅबचा खर्च स्वतंत्र राहील.

मेडिसिन विभागाची विशेष ऑफर:महोत्सवानिमित्त खउण मध्ये दाखल रुग्णांना तसेच इतर ॲडमिट रुग्णांना हॉस्पिटल बिलावर ५० टक्क्यांपर्यंत विशेष सवलत देण्यात येणार आहे.

सर्व प्रमुख इन्शुरन्स कंपन्यांची कॅशलेस सुविधा:हॉस्पिटलमध्ये Star Health, Niva Bupa, Care Health, ICICI Lombard, H¦FC ERGO, Aditya Birla Health Insurance, Tata AIG, SBI General, Bajaj Allianz, Reliance General, Future Generali, digit Insurance, Universal Sompo, Cholamandalam MS तसेच Medi Assist, Vidal Health, Paramount, FHPL, MD India, Health India यांच्यासह सर्व प्रमुख TPA आणि हेल्थ इन्शुरन्स कंपन्यांची कॅशलेस सुविधा उपलब्ध आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ:महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र रुग्णांना फ्रॅक्चर, मुतखडा, प्रोस्टेट, जन्मजात विकार, बालरोग उपचार आदींसाठी मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येतात.

तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत कुटुंब नियोजन, गर्भाशय पिशवी काढणे, गर्भाशय पिशवी साफ करणे, अपेंडिक्स, हर्निया तसेच कान–नाक–घसा शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गतही पात्र रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रियेचा लाभ दिला जातो.

उपलब्ध वैद्यकीय सेवा:हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग, जनरल सर्जरी, मेडिसिन, अस्थिरोग, बालरोग, नेत्ररोग, त्वचा व केस रोग, कान–नाक–घसा, ट्रॉमा केअर सेंटर, सोनोग्राफी, खउण, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, २४ तास आपत्कालीन सेवा, अनुभवी डॉक्टर, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत.

वर्धापन दिनानिमित्त आयोजित या विशेष आरोग्य सेवा महोत्सवाचा लाभ घेऊन स्वतःचे व कुटुंबियांचे आरोग्य जपावे, असे आवाहन खंडागळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. परेश खंडागळे व डॉ .स्वाती खंडागळे यांनी केले आहे.

एस.टी. महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त सांगोला बसस्थानकात आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण

सांगोला : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभर राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण उपक्रमांतर्गत सांगोला बसस्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

एसटी महामंडळाच्या हरित भविष्यासाठी एक पाऊल पुढे या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात बसस्थानक परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचे संरक्षण, प्रदूषणावर नियंत्रण आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवाई जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत, वृक्ष लावणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. लावलेले वृक्ष जगविण्यासाठीही सर्वांनी पुढाकार घ्यावा,असे आवाहन केले.

कार्यक्रमास एसटी महामंडळाचे आगार व्यवस्थापक अंकुशराव सरगर,स्थानक प्रमुख पंकज तोंडे,वन विभाग अधिकारी इंगवले मॅडम तसेच कर्मचारी व स्थानिक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनीही वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला.

एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

मुख्याधिकारी डॉ सुधीर गवळी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लिंगायत स्मशान भूमीमध्ये वृक्षारोपण

स्वच्छ, सुंदर सांगोला व वृक्ष लागवड उद्दिष्ट पूर्ती कडे सांगोला नगरपालिकेचे पाऊल

सांगोला : सांगोला नगरपालिका लोकनियुक्त नगराध्यक्ष, नगरसेवक व मुख्याधिकारी यांनी स्वच्छ सुंदर बरोबरच हरित सांगोला करण्याचा संकल्प केला असून त्याचीच परिपूर्ती म्हणून सांगोला शहरात अतिक्रमण हटविण्या बरोबरच मिळेल त्या जागेत वृक्ष लागवडीला मोठ्या प्रमाणात सुरवात केली आहे.

स्वच्छतेला महत्व देणाऱ्या सांगोला नगरपरिषदेने चालू वर्षी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुख्याधिकारी डॉ सुधीर गवळी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार दि.१३ जुलै रोजी जुन्या मेडशिंगी रोडवरील लिंगायत स्मशानभूमीत वड, पिंपळ, करंज,बदाम यासारख्या वृक्षांची मुख्याधिकारी यांचे हस्ते लागवड करण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, गटनेते प्रशांत धनवजीर, सभापती माऊली तेली, नगरसेवक अरुण पाटील, काशिलिंग गावडे, नगरसेविका आशाताई यावलकर, सभापती छायाताई मेटकरी यांचेसह आसिफ मुलानी, रत्नाकर पाटणे, सुमित चांदणे , बसवेश्वर युवक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह न.पा.कर्मचारी उपस्थित होते.

फॅबटेक कॉम्प्युटर विभागातील २८ विद्यार्थ्यांची कृतॅनिक सोल्युशन्स प्रा.लि.कंपनीत निवड

सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला मधील कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागातील तब्बल २८ विद्यार्थ्यांची कृतॅनिक सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या नामांकित माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीमध्ये कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आकाश गोरे, अनिकेत घाटगे, अनुज शिंदे, रोहन चोपडे, फैजअहेमद मुलाणी, हेमंत गुंजाळ, दीक्षा कांबळे, काशिनाथ बिरादार, सुशांत कोरे, विकी लटके, मकरंद गलांडे, अयुब मुलाणी, नामदेव फाळके, निंगराज बिराजदार, प्रांजली कदम, प्रीती पाटील, रोहन चव्हाण, रोहित लेंडवे, साक्षी नागणे, समर्थ पाटील, सार्थक नरळे, सोजर गायकवाड, स्वप्नील बनसोडे, स्वप्नील जाधव, गौरी तांबवे, तेजस मोहरे, तृप्ती बाबर आणि वैष्णवी पाटील यांचा समावेश आहे. या यशाबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती नीलवर्णा बिरासाहेब रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ. अमित रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. धनंजय शिवपुजे, कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. तानाजी धायगुडे आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

गोव्याच्या इयत्ता सहावी मराठी पाठ्यपुस्तकात नाझरेच्या फारुक एस. काझी यांची साहित्यकृती

सांगोला : सांगोला तालुक्यातील नाझरे गावचे सुपुत्र, ज्येष्ठ साहित्यिक व बालसाहित्यकार फारूक एस. काझी यांच्या साहित्याला मोठा मान मिळाला असून, त्यांच्या एका कथेचा समावेश गोवा राज्याच्या इयत्ता सहावीच्या 'सुलभ गोमंत भारती' या मराठी पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. गोवा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) प्रकाशित करत असलेल्या या अधिकृत पाठ्यपुस्तकातून आता हजारो विद्यार्थी फारूक काझी यांच्या साहित्याचा अभ्यास करणार आहेत.

सांगोला तालुक्यातील नाझरे या ग्रामीण भागातून साहित्यविश्वात वेगळी ओळख निर्माण करणारे फारूक काझी यांनी बालसाहित्य, कथा, कविता आणि विविध साहित्यप्रकारांत सातत्यपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या साध्या, ओघवत्या आणि मुलांच्या भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या लेखनशैलीमुळे त्यांचे साहित्य वाचकांमध्ये विशेष लोकप्रिय आहे. आता त्यांच्या कथेचा शालेय पाठ्यपुस्तकात समावेश झाल्याने त्यांच्या साहित्यकार्याला राज्याबाहेरही मान्यता मिळाली आहे.

ग्रामीण मातीतून घडलेल्या एका साहित्यिकाची कथा गोवा राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार असल्याने हा सांगोला तालुक्यासह नाझरे गावासाठी अभिमानाचा क्षण मानला जात आहे. शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून फारूक काझी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील नवोदित लेखकांनाही प्रेरणा मिळणार आहे.

गोवा राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात स्थान मिळणे ही कोणत्याही साहित्यिकासाठी मोठी उपलब्धी मानली जाते. फारूक काझी यांच्या या यशामुळे सांगोला तालुक्याच्या साहित्य परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, नाझरे गावाच्या शिरपेचातही मानाचा तुरा खोवला गेला आहे.

छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०२४ मध्ये 'माहीर, आईबाबा आणि विक्रम' या नावाने प्रसिद्ध झालेली ही कथा पाठ्यक्रम समितीने निवडली. गोवा पाठ्यपुस्तक निर्मिती विभागाचे मन:पूर्वक आभार. कसलाही परिचय नसताना त्यांनी माझी कथा निवडली, पाठ्यपुस्तकात आणली ही माझ्यासाठी विशेष बाब आहे.

–फारूक काझी गुरुजी

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सहअध्यक्षपदी ॲड.सचिन देशमुख

सांगोला : राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समित्यांवर सहअध्यक्षांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार सांगोला विधानसभा मतदारसंघाच्या क्षेत्रस्तरीय समितीच्या सहअध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना शेतापर्यंत सर्व हंगामात सहज पोहोचता यावे, कृषी मालाची वाहतूक सुलभ व्हावी तसेच ग्रामीण भागातील शेत व पाणंद रस्त्यांचे जाळे सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने २४ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरू केली होती. या योजनेच्या अंमलबजावणीत अधिक सुसूत्रता, पारदर्शकता आणि लोकसहभाग वाढावा यासाठी वेळोवेळी शासन निर्णयात सुधारणा करण्यात आल्या आहेत. १४ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीवर सहअध्यक्षांची नियुक्ती करण्याचे अधिकार महसूल मंत्र्यांना देण्यात आले होते.

त्यानुसार राज्यातील विविध विधानसभा मतदारसंघांसाठी सहअध्यक्षांची निवड करण्यात आली असून, सांगोला विधानसभा मतदार संघासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन देशमुख यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

या समितीमार्फत शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांचे नियोजन, प्राधान्यक्रम निश्चित करणे, कामांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे, स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधणे तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाणार आहे. त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना या योजनेचा अधिक प्रभावी लाभ मिळण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सचिन देशमुख यांची या महत्त्वपूर्ण पदावर झालेली नियुक्ती ही सांगोला तालुक्यासाठी महत्त्वाची मानली जात असून, त्यांच्या माध्यमातून शेत/पाणंद रस्त्यांच्या विकासकामांना गती मिळेल आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या उभारणीत अधिक समन्वय साधला जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

प्रवीण बागडे यांची स्वीय सहाय्यकपदी पदोन्नती

नागपूर : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर येथील कुलगुरू कार्यालयात कार्यरत प्रवीण मोरेश्वर बागडे यांची स्वीय सहाय्यक (वर्ग-१) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. विद्यापीठ प्रशासनाने नुकत्याच निर्गमित केलेल्या पदोन्नती आदेशानुसार त्यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी संचालनालय, विस्तार शिक्षण, माफसू, नागपूर येथे नव्या पदाची सूत्रे हाती घेतली. बागडे यांना प्रशासकीय क्षेत्रातील २५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. महाराष्ट्र शासनातील अनेक मंत्री व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक तसेच विशेष कार्य अधिकारी (जड्ड) म्हणून त्यांनी उल्लेखनीय सेवा बजावली आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि राज्यपाल यांच्या नागपूर दौऱ्यांदरम्यानही त्यांनी प्रतिनियुक्तीवर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

बागडे हे विद्यापीठ अधिनियम, अधिनियमावली, प्रशासकीय नियम, कार्यालयीन कार्यपद्धती तसेच मंत्रालयीन कामकाजातील तरतुदींमध्ये पारंगत आहेत. कामाचा तातडीने निपटारा करण्याच्या त्यांच्या कार्यक्षमतेमुळे विद्यापीठाच्या अनेक महत्त्वाच्या प्रशासकीय कामांना गती मिळाली. सांगली जिल्ह्यातील तडसार (ता. कडेगाव) तसेच नागपूर जिल्ह्यातील दुधबर्डी (ता. कळमेश्वर) येथे कृषी विज्ञान केंद्र (घतघ) स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या २० हेक्टर शासकीय जमिनीचा त्वरित मंजुरी प्रस्ताव मिळविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यासाठी मंत्रालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करून आवश्यक प्रशासकीय मंजुरी मिळविण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय ठरले. तसेच नागपूर येथील कामठीच्या ड्रॅगन पॅलेस परिसरात 'विपश्यना केंद्रा'साठी सुमारे ५० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. माफसूमधील विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत कर्तव्यनिष्ठेने, शिस्तबद्धपणे आणि गोपनीयता जपत पार पाडल्या आहेत. उत्कृष्ट समन्वय कौशल्य, संघटन क्षमता आणि विद्यापीठाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांनी प्रशासनात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कार्यालयीन कामकाजाबरोबरच विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सहशैक्षणिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांना 'उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार' आणि 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार' प्रदान करून गौरविले आहे.

प्रशासनाबरोबरच प्रवीण बागडे हे साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. विविध वृत्तपत्रांमध्ये त्यांच्या ४८८ लेखांचे प्रकाशन झाले असून लोकमत टाइम्सच्या 'सिटी टॉक्स' सदरात १०५ हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. तसेच दैनिक नवे शहर (मुंबई) मधील 'वाचक संवाद' या सदरात त्यांच्या अनेक मुलाखती प्रकाशित झाल्या आहेत. सामाजिक समता, मानवता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या लेखनातून प्रकर्षाने जाणवतो. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रीय लोकमित्र पुरस्कार, गांधी–आंबेडकर पुरस्कार, भारतीय एकता पुरस्कार, उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार, उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार, प्रबुद्ध साहित्यरत्न पुरस्कार आणि राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार यासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या या पदोन्नतीबद्दल माफसूचे अधिकारी, कर्मचारी, साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील प्रशासकीय, साहित्यिक आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

म्हैसाळ योजनेचे रखडलेले काम तत्काळ पूर्ण करा ; दिपकआबांच्या अधिकारी आणि ठेकेदारांना सूचना

माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केली म्हैसाळ योजनांच्या कामाची पाहणी

सांगोला : सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदायिनी असणाऱ्या म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या विस्तारीकरणाचे काम गेल्या काही दिवसांपासून रखडले आहे. या कामाला मा.आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी भेट देऊन ठेकेदार तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून रखडलेली कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

सदरचे काम अपूर्ण असल्याने योजनेच्या पाण्याचा अनेक गावातील नागरिकांना लाभ मिळत नाही मा. आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी या कामांची पाहणी केली. म्हैसाळ सिंचन योजनेच्या मूळ प्रकल्पात सांगोला तालुक्यातील पारे, घेरडी व सोनंद या तीनच गावांचा समावेश होता. त्यामुळे अनेक गावातील शेतकरी या पाण्यापासून वंचित राहत होता. याबाबत राज्य सरकार आणि संबंधित मंत्र्यांकडे वारंवार पाठपुरावा करून माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी आणखी ८ गावे आणि ४ तलावांचा या योजनेत समावेश केला होता यासाठी राज्य सरकारकडून स्वतंत्र १०० कोटी रुपयांचा निधी दिपकआबांनी विशेष प्रयत्न करून मंजूर केला होता.

म्हैसाळ योजनेचे विस्तारीकरण झाले योजनेसाठी निधी मंजूर झाला परंतु गेल्या काही दिवसांपासून या योजनेचे काम संथ गतीने सुरू होते याबाबत लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांनी आपली व्यथा माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या कडे मांडली होती या पार्श्वभूमीवर त्यांनी रखडलेल्या कामांची पाहणी केली. रविवार दि १३ रोजी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी वायफळ ता. जत येथील म्हैसाळ योजनेच्या मुख्य कालव्यापासून ते नराळे, हबीसेवाडी, यमगरवाडी, मानेवाडी, घेरडी तसेच वाकी घे वाणिचिंचाळे, जवळा, आगलावेवाडी तरंगेवाडी आलेगाव, मेडशिंगी या परिसरात सुरू असणाऱ्या विकास कामांची पाहणी करून आढावा घेतला.

गेल्या अनेक दिवसांपासून ही कामे रखडल्याने म्हैसाळ योजनेतून या गावांना पाणी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. या परिसरातील शेतकऱ्यांनी सदरची तक्रार माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांना उर्वरित काम पूर्ण करून तत्काळ पाणी सोडण्याचे आश्वासन रविवारी दिवसभर माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी म्हैसाळ योजनेच्या रखडलेल्या कामांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना व ठेकेदारांना उर्वरित कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

तसेच कामे पूर्ण झाल्यानंतर लगेचच या योजनेतून बंद पाईपलाईनच्या सहाय्याने पारे, नराळे हबीसेवाडी, हंगीरगे गावडेवाडी, घेरडी, सोनंद या गावांसह वाकी घे, वाणिचिंचाळे, जवळा, आगलावेवाडी, तरंगेवाडी, भोपसेवाडी, आलेगाव आणि मेडशिंगी या गावांना लवकरच पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने या परिसरातील शेतकरी सुखावला आहे. सांगितल्यानंतर त्यांनी प्रत्यक्षात कामाची पाहणी करून संबंधित ठेकेदार आणि अधिकारी यांना लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी घेरडी गावचे माजी सरपंच दिलीप मोटे, भाऊसाहेब यमगर, चंद्रकांत कारंडे, मधुकर करतडे, नामदेव साळुंखे, संजय गायकवाड, सुरेश गावडे, सुखदेव गवडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी ठेकेदार तसेच लाभ क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.